चंद्रकांत पाटलांचा सवाल

‘त्या’ भेटींबद्दलही संभाजीराजे का सांगत नाहीत?

भाजपाने खासदार संभाजीराजे यांचा मोठा सन्मान केला आहे. मोदींनी त्यांना थेट राष्ट्रपती नियुक्तखासदार केले. चार वेळा भेट मागूनही पंतप्रधानांनी वेळ दिली नाही हे खरे असले तरी त्याला काही कारणे आहेत. मराठा आरक्षणाच्या मुद्यावर ही भेट मागितली होती. पण हा मुद्दा सध्या राज्य सरकारच्या अखत्यारीतच आहे. मग भेटून करणार काय? चार वेळा भेट झाली नसली तरी पूर्वी 40 वेळा भेट झाली आहे, हे ते का सांगत नाहीत.

– **चंद्रकांत पाटील,** प्रदेशाध्यक्ष भाजपा

कोल्हापूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मराठा आरक्षणावरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. मराठा आरक्षणाप्रश्नी चारवेळा पत्र लिहूनही पंतप्रधान मोदी यांनी वेळ दिला नाही, असा दावा करीत खासदार संभाजीराजे यांनी नुकतीच नाराजी व्यक्त केली होती. यावरून काँग्रेस, राष्ट्रवादीने भाजपावर टीकेची तोफ डागली होती. आता भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. संभाजीराजेंना सर्वाधिक सन्मान भाजपानेच दिला आहे, त्यांना चारवेळा पंतप्रधानांनी भेट नाकारली असली तरी त्यापूर्वी चाळीस वेळा भेट दिली आहे, याबद्दल ते का सांगत नाहीत? असा सवाल पाटील यांनी उपस्थित केला आहे.

पवारांच्या भेटीतून काहीही साध्य होणार नाही

मराठा आरक्षणासाठी संभाजीराजे यांनी शरद पवार यांची भेट घेतली असली तरी त्यामधून काहीही साध्य होणार नाही, असे मत शिवसंग्राम संघटनेचे नेते विनायक मेटे यांनी व्यक्त केले आहे. शरद पवार यांच्याशी सकारात्मक चर्चा झाल्याचे संभाजीराजे म्हणतात मात्र, अवघ्या 10 मिनिटांच्या या भेटीत मराठा आरक्षण, नोकऱ्या, सारथी या सर्व विषयांवर चर्चा कशी काय होऊ शकते, असा सवाल विनायक मेटे यांनी उपस्थित केला. लोकशाहीत कोणीही कोणाला भेटू शकते. मात्र, पवार यांचा मराठा आरक्षणाविषयीचा आजपर्यंतचा दृष्टीकोन पाहता या भेटीतून काहीही साध्य होणार नाही. ते म्हणाले की, संभाजीराजे छत्रपती हे राजे आहेत. आम्ही प्रजा आहोत. ते कोणालाही भेटू शकतात. आम्ही जनतेमध्ये जाऊन जनजागृती करत आहोत. आता संभाजीराजे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. मात्र, मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिले असते तर ही वेळच आली नसती, अशी टीका विनायक मेटे यांनी केली.

खासदारकीचा राजीनामा द्यावा

मराठा आरक्षणाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही भेटायला तयार नसतील तर संभाजीराजे छत्रपती यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा द्यावा, असे वक्तव्य माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी केले. राज्यात दौरे करून किंवा आंदोलन करून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही, असेही जाधव यांनी म्हटले. यावेळी हर्षवर्धन जाधव यांनी मराठा आरक्षणासाठी संभाजीराजे यांनी आणखी आक्रमक भूमिका घ्यावी, असे सूचविले. छत्रपती संभाजी राजेंनी भाजपच्या मदतीने संसदेत प्रस्ताव आणून मराठा आरक्षणाचा कायदा करावा. जर भाजपा आणि नरेंद्र मोदी संभाजी राजे यांचे ऐकत नसतील, भेटत नसतील तर त्यांनी खासदारकीचा राजीनामा द्यावा, असे हर्षवर्धन जाधव यांनी सांगितले.

कोरोना काळात बचतगटांची ६० कोटींची उलाढाल

कोल्हापूर, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कोरोना काळात राज्यभरातील बचतगटातील महिलांनी सुरु केलेल्या छोट्या व्यवसायातून सुमारे ६० कोटींपेक्षा जास्त रक्कमेची उलाढाल केली आहे. राज्यातील १९ जिल्ह्यातील ४० बचत गटामधील १९९ महिलांमार्फत ८ हजार ०५९ लिटर सॅनिटायझरची निर्मिती केली असून ५ हजार ०४९ लिटर सॅनिटायझरच्या विक्रीमधून ११ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

करोना संकटकाळात आवश्यक असणाऱ्या सॅनिटायझरची निर्मिती आणि विक्रीही बचतगटांमार्फत करण्यात आली. ३४ जिल्ह्यातील ७३० स्वयंसहायता समुहामधील १ हजार ९८१ महिलांमार्फत नुकतेच ८.७८ लाख मास्क बनवण्यात आले. ७.७६ लाख मास्कच्या विक्रीमधून १ कोटी १९ लाख रुपयांची उलाढाल झाली आहे. करोना संकटाच्या पहिल्या लाटेत या बचतगटांनी सुमारे १ कोटी १० लाख मास्कची निर्मिती करुन त्यांच्या विक्रीतून सुमारे १३ कोटी ३० लाख रुपयांची उलाढाल केली होती. लॉकडाउन काळात शहरी भागातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये भाजीपाला पुरवठा करण्याचे काम स्वयंसहाय्यता समुहांनी केले आहे. यामध्ये ३४ जिल्ह्यातील १ हजार ९६६ समूहातील ४ हजार १९६ महिला सहभागी असून त्यांनी ८ हजार ६४९ क्विंटल भाजीपाला विक्रीतून २ कोटी ७१ लाख रुपयांची उलाढाल केली आहे. पहिल्या लाटेच्या काळातही महिला बचतगटांनी यामाध्यमातून १६ कोटी ७५ लाख रुपयांची उलाढाल केली होती. फळे खरेदी-विक्रीमध्ये ३४ जिल्ह्यातील १ हजार २२५ समुहातील ३ हजार २०५ महिला सहभागी होत्या.

बालकांना तिसऱ्या लाटेचा धोका

बालरोगतज्ज्ञांचा टास्क फोर्स गठित

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. कोरोना संसर्गाचा लहान मुलांमध्ये होणाऱ्या प्रादुर्भावापासून प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचार पद्धतीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी बालरोग तज्ञांचा विशेष कार्यदल (टास्क फोर्स) डॉ. सुहास प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला आहे. त्यामध्ये 13 तज्ञ सदस्य असून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक त्याचे सदस्य सचिव आहेत.

कोरोना संसर्गाची शक्यता

राज्यात सध्या कोरोनाची दुसरी लाट सुरू आहे. कोरोना विषाणूत होणारे जनुकीय बदल आणि उत्परिवर्तनामुळे संभावित तिसरी लाट आल्यास त्यामध्ये लहान मुलांना कोरोना संसर्गाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यापासून लहान मुलांचा बचाव आणि आवश्यक उपचार पद्धती विकसीत करण्यासाठी बालरोग तज्ञांचा टास्क फोर्स नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले होते. रविवारी मुख्यमंत्र्यांनी राज्यभरातील बालरोग तज्ञांशी संवाद साधून संभाव्य तिसरी लाट आल्यास लहान मुलांच्या उपचाराबाबत त्यांनी चर्चाही केली केली होती.

> लहान मुलांमधील कोरोना संक्रमण कमी करण्यासाठी उपचारपद्धती विकसीत करण्यासाठी बालरोग तज्ञांच्या या विशेष कृती दलात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, औरंगाबाद, नागपूर येथील तज्ज्ञांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले. यासंदर्भात आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास यांच्या स्वाक्षरीने नुकताच शासन निर्णय जाहिर केला आहे.

आजारपणानंतर शरद पवारांची कामाला सुरुवात

राकाँ मंत्र्यांची घेणार झाडाझडती!

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांत कुरबूरी सुरू झाल्याचे दिसत आहेत. त्यामधून ज्येष्ठ नेते म्हणून मार्ग काढण्याची जबाबदारी शरद पवार यांच्यावर आहे. आता दोन महिन्यांच्या आजारपणानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांची कामाला सुरुवात केली आहे. त्यानुसार येत्या एक जून रोजी ते राष्ट्रवादीच्या मंत्र्यांची बैठक घेवून केलेल्या कामांचा आढावा घेणार आहेत.

आमदारांचीही घेणार बैठक

मंत्र्यांकडून आढावा घेतल्यानंतर शरद पवार राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक घेणार आहेत. मागील काळात धनंजय मुंडे याच्यावर त्यांच्या तिसऱ्या पत्नीने आरोप केले होते. तर राष्ट्रवादीचे गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर खंडणीचे आरोप झाल्याने राष्ट्रवादी आणि महविकास आघाडी अडचणीत आली होती या पार्श्वभुमीवर रिक्त मंत्र्याची पदे भरण्याबाबत जुलै महिन्यात अधिवेशनापूर्वी पक्षाकडून निर्णय होण्याची शक्यता आहे. त्या करीता या आढावा बैठका महत्त्वाच्या आहेत.

जयस्वाल नेमणुकीचा संदर्भ

शरद पवार यानी बुधवारी सायंकाळी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची वर्षा निवासस्थानी जावून भेट घेतली. या चर्चेचा तपशील अधिकृतपणे सांगण्यात आला नसला तरी त्याबाबत माध्यमांतून काही माहिती देण्यात आली आहे. सूत्रांच्या माहिती नुसार गेल्या काही दिवसांत राष्ट्रवादीचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या विरोधात केंद्रीय तपास यंत्रणाकडून केल्या जाणाऱ्या कारवाईसंदर्भात पवार यांच्याशी मुख्यमंत्र्याची चर्चा झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सीबीआयच्या प्रमुख पदावर राज्याचे माजी पोलिस महासंचालक सुबोध जयस्वाल यांची नियुक्ती झाली, त्यानंतर राज्यात सीबीआयकडून अनील देशमुख प्रकरणात सुरू असलेल्या चौकशीला वेगळे वळण लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जयस्वाल यांचे राज्यात महासंचालक असताना देशमुख यांच्याशी मतभेद होते.

‘सेल्फी पॉइंट’चा आढावा

मुंबई. राज्याचे पर्यटन आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील ‘सेल्फी पॉइंट’ बांधकामाचा गुरुवारी आढावा घेतला, तो क्षण.

राज्य सरकारचे एक पाऊल मागे

उजनीच्या पाण्याचा ‘तो’ आदेश रद्द

बारामती, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गेल्या काही दिवसांपासून उजनी धरणाच्या पाण्यावर वाद पेटला होता. अखेर आंदोलकांच्या आक्रमक पवित्र्यापुढे राज्य सरकारला एक पाऊल मागे घ्यावे लागले आहे. जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी काढलेला तो आदेश लेखी रद्द करण्यात आला आहे. पाटील यांनी 18 मे रोजी उजनी धरणातून सोलापूरच्या हक्काचे पाणी इंदापूरला देणार नाही. तसा या पूर्वी काढलेला सर्वेक्षण आदेश रद्द करण्याचे तोंडी सांगितले होते. परंतु, जोपर्यंत लेखी आदेश मिळत नाही.तोपर्यंत आंदोलनाचा पावित्रा घेतला होता. अखेर गुरुवारी उपसचिवांनी 22 एप्रिल 2021 रोजी काढलेला आदेश रद्द केल्याचे पत्र काढले आहे.

गुन्हा दाखल करण्याची मागणी

तत्पूर्वी, जयंत पाटील यांनी उजनी जलाशयातून इंदापूर तालुक्याचा पाच टीएमसी पाणी देण्याचा निर्णय रद्द केला. मात्र अद्याप याचा अध्यादेश काढण्यात आलेला नाही. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे जयंत पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी जनहित शेतकरी संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी केली होती. सात दिवस उलटूनही नवा अध्यादेश काढण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला होता. पाटील यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करावा, अन्यथा गनिमी काव्याने मंत्रालय किंवा त्यांच्या बंगल्यात घुसल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा जनहित शेतकरी संघटनेने राज्य शासनाला दिला होता.

पेट्रोल शंभरीपार; आता नशीब कुणाचे?

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राज्यातील जनतेला इंधन दरवाढीची मोठी झळ बसत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांत पेट्रोलच्या दराने शंभरी ओलांडली आहे. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. आपल्या नशीबामुळे देशात पेट्रोलचे भाव कमी झाले आहेत तर जनतेसाठी चांगलेच आहे, असे पंतप्रधान 2015 मध्ये जाहीर भाषणात सांगत होते. आता 2021 मध्ये पेट्रोलच्या दराने शंभरी गाठली आहे, आता कुणाचे नशीब म्हणायचे पंतप्रधान महोदय? असा खोचक सवाल राकाँ प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी केला आहे.

> पेट्रोलच्या वाढत्या दरांबाबत 2021 मध्ये मोदी काहीच बोलत नाहीत. त्यामुळे शेवटी काय ‘बदनसीब जनता’. मोदींच्या नशीबाने जर पेट्रोलचे दर कमी होतात, तर मग आता पेट्रोलने शंभरी कशी गाठली याचे उत्तर नशीबवान मोदींनी द्यावे.
>
> – **नवाब मलिक,** अल्पसंख्यांक मंत्री

शेतकऱ्यांसाठी कधी पत्र लिहिणार?

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी लक्षद्वीप बेटावर गोमांसावर बंदी येऊ नये, यासाठी थेट पंतप्रधानांना पत्र लिहिले आहे. त्यावरून भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी ट्विटरच्या माध्यमातून पवारांना टोला लगावला आहे. लॉकडाऊनमध्ये नुकसान झाले म्हणून बारमालकांना मदत केली पाहिजे, असे पत्र लिहिणारे पवार आता लक्षद्वीप बेटावर गोमांसावर बंदी येऊ नये यासाठी थेट पंतप्रधानांना पत्र लिहितात. कोकणात वादळ व अन्य भागात अवकाळी पावसाने नुकसान झाले पण शेतकऱ्यांची आणि पशुधनाची चिंता व्यक्त करणारे पत्र ते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना कधी लिहितील?, असा खोचक सवाल उपाध्ये यांनी केला आहे.

भाजपाचा पवारांना सवाल

मराठा आरक्षणाबाबतही विचारा

> मराठा समाजाचे आरक्षण टिकवण्यात राज्य सरकार कमी का पडले हे विचारणारे पत्र कधी लिहीणार? 12 बलुतेदारांना मदत मिळाली नाही त्याची विचारणा करणारे पत्र राज्यसरकारला पवार कधी लिहीणार? इतकंच नाहीतर महाराष्ट्रात कोकणात वादळ व अन्य भागात अवकाळी पावसाने नुकसान झाले पण शेतकऱ्यांची आणि पशुधनाची चिंता व्यक्त करणारे पत्र पवार कधी लिहिणार.
>
> – **केशव उपाध्ये,** भाजपा

बार्ज अपघात

पाच कंपन्यांना बजावले समन्स

मुंबई . चक्रीवादळाच्या तडाख्यात अनेक संसार उद्धवस्त झाले आणि अनेकांचे प्राण गेले. त्यातच, बॉम्बे हायवरील तेल उत्खनन करणाऱ्या पी 305 हे बार्ज चक्रीवादळात बुडाले. या दुर्घटनेप्रकरणी यलोगेट पोलिसांनी 5 कंपन्यांना समान्स बनावले आहे. या प्रकरणी 10 जणांनी जबाब नोंवदले आहेत. 28 मृतदेहांची ओळख पटली नसून त्यांची डीएनए चाचणी करण्यात येणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दुर्घटनेप्रकरणी कॅप्टन राकेश बल्लाव इतर काही जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यलोगेट पोलिसांनी पी 305 तराफावरील वाचलेल्या कर्मचाऱ्यांकडून या प्रकरणाची माहिती घेतली. यावेळी चक्रीवादळाची पूर्वसूचना मिळाल्यापासून बार्ज बुडेपर्यंतचा घटनाक्रम पोलिसांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. नौदलामुळे सुरक्षिततरित्या बचावलेले शेख सध्या ताडदेव अपोलो रुग्णालयात उपचार घेत आहेत. चक्रीवादळाने रौद्र रुप धारण केल्याने बॉम्बे हायजवळील तेल विहिरींवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी तयार केलेला पी 305 हा तराफा समुद्रात बुडाला.

सरकार वाचविण्यासाठी ‘होम’मध्ये बसून हवन

मुंबई . राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारमधील मंत्र्यांमध्ये झालेल्या खडाजंगीमुळे राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. तसेच, पदोन्नतीच्या मुद्यावरुनही सरकारमध्ये मतभेद असल्याचे समोर आले आहे. यावरून मनसेने ठाकरे सरकारवर व मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे. कोरोनाच्या संकटापासून वाचवण्यासाठी नाही तर सरकार वाचवण्यासाठी होममध्येच असणाऱ्यांचे जोरात हवन चालू आहे, अशी चर्चा आहे.

आमदार प्रताप सरनाईकांना शोधा

ठाणे . ठाण्यातील शिवसेनेचे आमदार प्रताप सरनाईक गायब असून त्यांचा शोध घ्या, असे साकडे घालत भाजपाच्या शिष्टमंडळाने पोलिस आयुक्तांची भेट घेतली आणि अधिकृत तक्रार नोंदवली. तीन विविध घोटाळ्याप्रकरणी ईडी चौकशीचा ससेमिरा मागे लागल्याने सरनाईक गायब आहेत. काय झाले, कोणी किडनॅप केले, याची भीती मतदारांना वाटत आहे. तेव्हा, त्यांना शोधण्यासाठी कार्यवाही करावी, असे म्हणत भाजपा नेते किरीट सोमय्या, ठाणे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय केळकर आदीच्या शिष्टमंडळाने नवनियुक्त पोलिस आयुक्त जयजीतसिंह यांची भेट घेतली.

१० लाखांवरील कामांसाठी ई-निविदा

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत स्तरावर आता १० लाख रुपये किमतीपेक्षा मोठा कामासाठी ई-निविदा काढावी लागणार आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात ३ लाख रुपयांवरील कामासाठी ई-निविदा काढणे बंधनकारक होते. गाव पातळीवरील भ्रष्टाचार रोखण्यासाठी ३ लाखावरील कामांसाठी ई-निवीदा बंधनकारक करण्यात आल्याचे तत्कालीन सरकारकडून सांगण्यात आले होते. ही मर्यादा वाढवून आता १० लाख करण्यात आली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारकडून भ्रष्टाचारासाठी रान मोकळे केले जात असल्याची टीका भाजप नेते करत आहेत.

CHANGE IN NAME

I Arun Bhawoo Dayare R/o At, Post : Maniwali, Tal : Karjat, Dist - Raigad Changed my name as Arun Bhau Dayare (M-216859)

अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी जाहिरात

बाल विकास प्रकल्प अधिकारी गोरेगाव (पश्चिम), मुंबई प्रकल्पासाठी सेविका/मदतनीसची मानधनी पदे भरावयाची आहेत. सदर खाली नमूद केलेल्या अंगणवाडी भागातील स्थानिक असलेल्या प्रभागातील रहिवासी महिला उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. नमुद विभागा बाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच आपात्र उमेदवारांना अर्ज नाकारणेबाबत लेखी स्वरूपाचे कळविण्यात येणार नाही.

गोरेगाव (पश्चिम) प्रकल्पातील प्रभागवार अंगणवाडी सेविका/मदतनीस पदाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	रिक्त जागा असलेल्या प्रभागाचे क्रमांक	विभागचे नाव	रिक्त पदे	
			सेविका	मदतनीस
१	३५	वळणाई वसाहत मालाड वेस्ट	३	०
२	५६	तीन डोंगरी गोरेगाव वेस्ट	०	१
		एकूण पदे	०३	०१

सही/-
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
गोरेगांव (पश्चिम), मुंबई.

1) पात्रता :-

१) अंगणवाडी सेविका करीता किमान दहावी उतीर्ण
२) अंगणवाडी मदतनीस करीता किमान सातवी उतीर्ण
३) स्थानिक रहिवासी :- उमेदवार सेविका साठी मालाड (वेस्ट) मुंबई भागातील प्रभाग निहाय वर नमूद केलेल्या विभागातील स्थानिक रहिवाशी असावा. मालाड (वेस्ट) विभागाबाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही.
४) उमेदवार मदतनीस साठी गोरेगाव (वेस्ट) मुंबई भागातील प्रभाग निहाय वर नमूद केलेल्या विभागातील स्थानिक रहिवाशी असावा. गोरेगाव (वेस्ट) विभागाबाहेरील अर्जाचा विचार केला जाणार नाही
५) वयोगट २१ ते ३० वर्ष (अर्ज सादर करण्याच्या अतिम दिनांकस)
६) दोन जिवंत अपत्या पेक्षा जास्त अपत्य नसावीत.
७) उमेदवाराची निवड केवळ गुणवत्ता व इतर नेसर्गिक गुणांचे आधारे केली जाईल.
८) ज्या अंगणवाडी केद्राचे कार्यक्षेत्रात मरठी भाषेव्यतिरिक्त इतरबहुभाषीक लोकांची संख्या साधारण ५० हिंदी इत्यादी अशा अंगणवाडी, बंगाली, तेलुगु, कन्नड उदा. पेक्षा जास्त असेल % साठी अशा भाषा अवगत असणाऱ्याना प्राधान्य दिले जाईल.
९) जाहिराती नुसार प्राप्त अर्ज मान्य करणे अथवा संपूर्ण जाहिरात रद्द करणे या बाबतचे अधिकार विभागाकडे राखुन ठेवण्यात येत आहे .
१०) शासकीय संस्थेमधील शासन अनुदानीत संस्थे तील अनाथ महिलांनी व मुलींनी जिल्हा/ महिला व बालविकास अधिकारी मुंबई उपनगर यांचे प्रमाणपत्र जोडवे.
११) मासिक मानधन शासन नियमा नुसार सेविका यांना रु व मदतनीस -/८३२५. यांना रु. ४३२५/- देण्यात येईल. व वेळोवेळी शासनाने केलेली वाढ देय राहील.
१२) लहान कुटुंब असलेबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडवे.
१३) मागासवर्गीय उमेदवारानी जातीचा दाखला सक्षम अधिकारी यांचा जोडावा.
१४) मानधनी पदे असल्या कारणाने उमेदवार बदलीस पात्र राहणार नाही.
१५) मानधना वरील खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून मिळणे बंद झाल्यास त्यांची सेवा संपुष्टात येईल.
१६) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रे व माहिती खोटी अढळल्यास उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
१७) अर्ज अपुर्ण भरलेला असणे / खाडाखोड असणे अर्जासोबत जोडलेली प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती साक्षांकित नसणे इ कारणामुळे अर्ज रद्द झाल्यास ते कळविण्यात येणार नाही.
१८) अर्जदारानी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत म्हणजे दिनांक : 07/06/2021 पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्ज बाल विकास प्रकल्प अधिकारी, गोरेगाव (पश्चिम) मुंबई. याचे कार्यालय, १ मजली, सुंदर नगर BMC प्रथमिक आरोग्य केंद, पवन बाग, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४. येथे सादर करावेत. तसेच पोस्टाने आलेले अर्ज वेळेत प्राप्त झाल्यास स्विकारले जातील व उशिराने आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. शासकीय सुट्टीच्या दिवशी कार्यालय बंद राहील. अर्ज स्विकरण्याची वेळ सकाळी. ११.०० ते ५.०० पर्यंत असेल.

सही/-
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
गोरेगांव (पश्चिम), मुंबई.

डी.जी.आय.पी.आर. २०२१/२०२२/६२३

पश्चिम रेल्वे

खार दक्षिण बृ. मुं. मनपा एफओबी व पूर्व दिशेकडील इलेव्हेटेड बुकिंग कार्यालयादरम्यानच्या स्काय वॉक बंद ठेवण्यासंदर्भात

खार स्थानकात दक्षिण दिशेकडे नवीन ६ मी. रुंद एफओबीच्या बांधकामासंदर्भात पूर्व दिशेकडील बुकिंग कार्यालय व जुन्या विद्यमान खार दक्षिण बृ. मुं. मनपा एफओबीला जोडणारा स्कायवॉक पाडणे आवश्यक आहे. पाडकाम **दि. २८.०५.२०२१ रोजी सकाळपासून** सुरू होईल. त्यामुळे **पुढील ७५ दिवसांकरिता** स्कायवॉक व पूर्व दिशेकडील बुकिंग कार्यालय बंद ठेवण्यात आले आहे. प्रवासी पश्चिम दिशेकडील बुकिंग कार्यालयातून तिकिटे खरेदी करू शकतात तसेच पूर्व व पश्चिम कनेक्टिव्हिटीकरिता खार दक्षिण दिशेकडील जुना बृ. मुं. मनपा एफओबीचा वापर करू शकतात. होणाऱ्या गैरसोयीबद्दल अत्यंत दिलगीर आहोत. 0136

आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

युनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

(भारत सरकारचा उपक्रम) A Government of India Undertaking

आन्ध्रा Andhra | कार्पोरेशन Corporation

स्ट्रेस्ड ॲसेट मॅनेजमेंट ब्रँच : १०४, तळमजला, भारत हाऊस, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३. **दूर. क्र. :** (०२२) – २२६१ ५२०१, २२६१ ५२०२, २२६१ ५२०५. **ई-मेल :** samvmumbai@unionbankofindia.com

स्थावर संपत्तीच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सीक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(६) च्या तरतूदीसह सदर अंतर्गत जंगम प्रतिभूत संपत्तीच्या विक्रीकरिता ई–लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे आम जनतेस देण्यात येते आहे तसेच विशेषत: कर्जदार व हमीदार यांना देण्यात येते की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण/प्रभारित खालील विवरणीत जंगम प्रतिभूत संपत्ती जिचा युनियन बँक ऑफ इंडियाच्या (प्रतिभूत धनको) प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विधायक/**प्रत्यक्ष ताबा** घेण्यात आला आहे त्या मालमत्तेची विक्री युनियन बँक ऑफ इंडियाच्या थकबाकीच्या खालील निर्देशित संबंधित कर्जदार व हमीदारांकडून वसुलीसाठी खालील निर्देशित रकमेच्या वसुलीकरिता ही **जशी आहे जेथे आहे जशी आहे जी आहे** व **जी काही आहे तेथे आहे** तत्त्वावर व कोणत्याही अडथळ्याविना **दि. ३०.०६.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. १.००** रोजी खालील निर्देशित वेळेत विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कमसुद्धा खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे :

कर्जदार, सहकर्जदार व हमीदाराचे नाव व पत्ता :	थकित रक्कम : रु.
१) **आसुती ट्रेडिंग प्रा. लि.** (कर्जदार), १४१८, दलामल टॉवर बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१. २) **श्री. सिद्धार्थ मदनलाल बगरेचा** (संचालक/हमीदार) सुयोग रेसिडेन्सी, फ्लॅट क्र. ५०२, अॅव्हेंटिस्ट हॉस्पिटलजवळ, सॅसलबरी पार्क, गुलटेकडी, पुणे – ४११ ०३७. ३) **श्री. राज कुमार गोईल** (संचालक/हमीदार) जीएच–१४/२८३, पश्चिम विहार, नवी दिल्ली – ११० ०८७.	**४७,६१,५८,०८९.९८** (रु. सत्तेचाळीस एकसष्ट लाख अठ्ठावन्न हजार एकोणनव्वद व अठ्याण्णव पैसे मात्र)

मालमत्ता :– स्थावर मालमत्ता अर्थात फ्लॅट क्र. २०२, २ रा मजला, सी विंग, इमारत **नमो शिवास्तू सिटी,** बिल्डिंग क्र. ३, **मोजमापित** क्षेत्र **६४६.०४** चौ. फूट, प्लॉट धारक सर्व्हे क्र. १०६, हिस्सा क्र. १,२,३,४ व स्वर्हे क्र. ११०, मु. विवोर स्थित, पालघर नगर परिषदेच्या अधिकारक्षेत्रात व नोंदणीकृत जिल्हा पालघर व त्याच्या सीमापुढीलप्रमाणे :– ■ **उत्तर व त्यादिशेस** : नमो शिवास्तू सिटी, इमारत क्र. ३डी, ■ **दक्षिण व त्यादिशेस** : अंतर्गत रस्ता/ मोकळा प्लॉट, ■ **पूर्व व त्यादिशेस** : बांधकामाधिन इमारत, ■ **पश्चिम व त्यादिशेस** : नमो शिवास्तू सिटी, इमारत क्र. ३बी.

■ **ई – लिलाव दिनांक व वेळ** : दि. ३०.०६.२०२१ रोजी स. ११.०० ते दु. १.००, ■ **राखीव मूल्य** : रु. २९,०७,०००/–, ■ **जमा करावयाची इसारा रक्कम** : रु. २,९०,७००/–, ■ **मागणी सूचना दिनांक** : २७.०९.२०१७, ■ **ताबा सूचना दिनांक** : ३१.०७.२०१८ (प्रत्यक्ष ताब्याअंतर्गत)

विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तीकरिता दिलेली लिंक अर्थात www.unionbankofindia.co.in वा https://www.ibapi.in वा www.mstcecommerce.com येथे भेट द्या.

मालमत्तेचे परिक्षणाची तारीख दि. १९.०६.२०२१

नोंदणीकरण व लॉग इन तसेच बोली नियमांकरिता भेट द्या : https://www.mstcecommerce.com/auctionhome/ibapi/indes.jsp.

दिनांक : २८.०५.२०२१
ठिकाण : मुंबई

सही/–
प्राधिकृत अधिकारी, युनियन बँक ऑफ इंडिया

फॉर्म-जी

स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे आमंत्रण

(इन्साल्व्हेन्सी अँण्ड बँकरप्ट्सी (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता परिसमापन ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३६ (ए) अंतर्गत)

माननीय एनसीएलटीचा १६ एप्रिल, २०२१ दिनांकित आदेश, २३ एप्रिल, २०२१ रोजी आरपीद्वारे करण्यात आलेली सार्वजनिक उद्घोषणा आणि कॉर्पोरेट कर्जदारांच्या धनकोंच्या समितीच्या निर्णयाच्या अनुरोधाने याद्वारे कॉर्पोरेट कर्जदार अर्थात अदित्य **आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड** (एव्हीएएल) आणि **आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड** (एएफपीएल) **(एकत्रिकृत कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रियान्वित)** करिता विभेदन योजना सादर करण्यासाठी स्वारस्याची अभिव्यक्ती आमंत्रित करण्यात येत आहे.

संबंधित विवरण		
१	कॉर्पोरेट ऋणकोचे नाव	१. आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड २. आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट ऋणकोचा संस्थापन दिनांक	१. २६ जून, १९८९ २. २४ नोव्हेंबर, २००३
३	कॉर्पोरेट ऋणको यांच्याशी संबंधित / नोंदणीकृत असलेले प्राधिकारी	कंपन्या निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट ऋणकोंचा कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर / लिमिटेड लाएबिलिटी आयडेंटिफिकेशन नंबर	१. U31200MH1989PLC052364 २. U51505MH2003PTC143265
५	कॉर्पोरेट ऋणको यांच्या नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता व मुख्य कार्यालय (काही असल्यास)	सर्व्हे क्र. १६८, हिस्सा क्र. १०, सोनाळे गांव, भिवंडी बायपास रोड, ठाणे-४२१ ३०२, महाराष्ट्र, भारत.
६	कॉर्पोरेट ऋणकोची दिवाळखोरी प्रारंभ दिनांक	१. एव्हीएएल : ११ सप्टेंबर, २०१९ २. एएफपीएल : १५ मे, २०२० ३. एकत्रित : १६ एप्रिल, २०२१
७	स्वारस्य अभिव्यक्तीसाठीचे आमंत्रण दिनांक	२८ मे २०२१
८	संहितेच्या अनुच्छेद २५(२)(एच) अंतर्गत ठराव अर्जांकरिता पात्रता उपलब्धता	तपशील आयबीबीआयचे संकेतस्थळ www.adityavidyut.com येथे उपलब्ध आहे किंवा adityagroupcirp@gmail.com येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
९	अनच्छेद २९ ए अंतर्गत लागू अपात्रतेचे निकष	तपशील आयबीबीआयचे संकेतस्थळ www.adityavidyut.com येथे उपलब्ध आहे किंवा adityagroupcirp@gmail.com येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
१०	स्वारस्याच्या अभिव्यक्तीच्या स्वीकृतीची अंतिम तारीख	१२ जून २०२१
११	संभाव्य ठराव अर्जांची तात्पुरती सूची जारी होण्याची तारीख	२२ जून २०२१
१२	तात्पुरत्या सूचीकरिता हरकत सादर करण्याची अंतिम तारीख	२७ जून २०२१
१३	संभाव्य ठराव अर्जदारांची अंतिम सूची जारी होण्याची तारीख	०७ जुलै २०२१
१४	संभाव्य ठराव अर्जदारांसाठी माहितीचे ज्ञापन, मूल्यांकन निकष तसेच ठराव आराखड्याची विनंती सादर करण्याची तारीख	२७ जून २०२१
१५	ठराव आराखडा, मूल्यांकन निकष, माहिती ज्ञापन व पुढील माहिती प्राप्त करण्याची विनंतीचे स्वरूप	तपशील adityagroupcirp@gmail.com येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
१६	ठराव आराखडा सादर करण्याची अंतिम तारीख	२७ जुलै २०२१
१७	ठराव अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याचे स्वरूप	ई-मेल आयडीवर इलेक्ट्रॉनिक प्रारुपात किंवा वरील अनुक्रमांक २० किंवा २१ मध्ये वितरित पत्त्यावर स्पीड पोस्ट, रजिस्टर्ड पोस्ट वा हातबटवड्याद्वारे.
१८	मंजुरीकरिता निर्णय अधिकाऱ्यांकडे ठराव आराखडा सादर करण्याची अंदाजित दिनांक	२८ सप्टेंबर २०२१
१९	ठराव अधिकाऱ्यांचे नाव नोंदणीकरण क्रमांक	**श्री. क्षितिज गुप्ता** आयपी नोंदणीकरण क्र. **IBBI-IPA-002/IP-N00721/2018-19/12140**
२०	बोर्डकडे नोंदणीकरण केल्यानुसार ठराव अधिकाऱ्याचे नाव, पत्ता व ई-मेल	**नाव : क्षितिज गुप्ता, पत्ता :** फ्लॅट क्र. सी/१०४, लोट्स को-ऑप. हौ. सोसायटी, गुंदेचा व्हॅली ऑफ फ्लॉवर, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई उपनगर, मुंबई-४०० १०१, महाराष्ट्र, भारत.
२१	ठराव अधिकाऱ्याकडे पत्रव्यवहार करावयाचा पत्ता व ई-मेल	**पत्ता :** बी-२०२, शॅराटॉन क्लासिक, चरत सिंग कॉलनी, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०६९. **ई-मेल : kshitiz.ca@gmail.com** **adityagroupcirp@gmail.com**
२२	पुढील तपशील उपलब्ध असण्याचे वा प्राप्त करण्याचे ठिकाण	तपशील **adityagroupcirp@gmail.com** येथे ई-मेल करून प्राप्त करता येऊ शकेल.
२३	फॉर्म जी प्रसिद्धी दिनांक	२८ मे २०२१

टीपा :

१. यामध्ये प्रसिद्ध फॉर्म जी हा उपरोक्त कॉर्पोरेट कर्जदारांसाठी अगोदर प्रसिद्ध करण्यात आलेल्या फॉर्म जी चा पुढील भाग आहे आणि विद्यमान प्रस्तावित विभेदन अर्जदाराना अगोदर सादर केलेल्या स्वारस्याच्या अभिव्यक्तीसोबत राहण्याचा किंवा या फॉर्म जीच्या अटीमध्ये नवीन स्वारस्य अभिव्यक्ती सादर करण्याचा पर्याय असेल. या संदर्भात विद्यमान प्रस्तावित विभेदन अर्जदारांकडून विशिष्ट संवाद आवश्यक आहे.
२. ठराव आराखड्यातील अटी व शर्ती, बोली सादरीकरण प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर बदलली / सुधारित / तहकूब / रद्द / विस्तारित / परिवर्तित केली जाऊ शकेल.
३. आरपी हे धनको समितीद्वारे निर्देशांच्या अंतर्गत कोणतेही कारण न देता वा कोणतीही सूचना न देता वा दायित्वाविना प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रस्तावित बोलीदारास स्वीकारणे वा रद्द करणे वा अपात्र करण्याचा अधिकार राखून आहेत.

सीए क्षितिज गुप्ता, ठराव अधिकारी
आदित्य विद्युत अप्लायन्सेस लिमिटेड आणि आदित्य फॅब्रिकेशन्स प्रायवेट लिमिटेड करिता
पत्ता : फ्लॅट क्र. सी/१०४, लोट्स को-ऑप. हौ. सोसायटी, गुंदेचा व्हॅली ऑफ फ्लॉवर, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई उपनगर, मुंबई-४०० १०१, महाराष्ट्र, भारत.
दिनांक : २८ मे, २०२१
ठिकाण : मुंबई
ई-मेल : kshitiz.ca@gmail.com, adityagroupcirp@gmail.com

(टीप : सदरचा "फॉर्म जी" हा मूळ इंग्रजी "फॉर्म जी"चा स्वैर अनुवाद असून तफावत आढळल्यास इंग्रजी "फॉर्म जी"चा मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.)